प्रतिसाद

‘पूर्वा केमटेक प्रा.लि.चे कार्यकारी संचालक श्री. संजय पवार यांच्या, ‘ब्रँड बनवूनच मार्केटिंग करावं लागेल’ या अभ्यासपूर्ण लेखावरील ही स्वागतार्ह प्रतिक्रिया.

सरकारी मदतीची आशा नको; आत्मघाताचा दुर्दैवी मार्ग नको

# शेतमालाच्या मूल्यवर्धनाद्वारे अस्मानी- सुलतानीवर करा मात!



श्रीकांत पोहनकर
अध्यक्ष : पोहनकर फाऊंडेशन, पुणे
(मो.नं. ९८२२६९८१००)

आपल्या देशातील कृषिक्षेत्र दोन प्रकारच्या आपत्तींनी सतत ग्रासलेले असते. १) निसर्गनिर्मित व २) मानवनिर्मित. यापैकी कोणत्याही प्रकारची आपत्ती कोसळली तरी शासनाने मदत केलीच पाहिजे, अशी बहुसंख्य शेतकऱ्यांची अपेक्षा असते आणि एकगठ्ठा मतांच्या हिरव्यागार कुरणांच्या शोधात फिरणारी काही राजकारणी मंडळी त्या अपेक्षांना भरपूर खतपाणी घालत असतात! आपत्तीत सापडल्यानंतर रडत न बसता, डोळसपणाने त्वरित उपाययोजना करण्याऐवजी शासकीय मदतीकडे डोळे लावून बसणे, मदत मिळत नाही असे दिसल्यास अहिंसक किंवा हिंसक आंदोलने करणे, कर्ज, आर्थिक अनुदान किंवा अनुदानावर मिळणारे कृषी साहित्य यासाठी सरकारी कचेऱ्यांमध्ये असंख्य हेलपाटे घालणे यात बव्हंशी शेतकरी त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचे अनेक दिवस वाया घालवत असतात. चरितार्थासाठी पर्यायी उपाययोजना तयार नसली की माणूस आत्मविश्वास गमावून बसतो व त्यातून आत्महत्येसारखं अत्यंत दुर्दैवी पाऊल उचलतो!

कोणत्याही कारणाने द्राक्षांचे भाव पडले तर निसर्ग किंवा सरकारच्या नावाने शंख करीत न बसता; त्वरित पिकाचे बेदाण्यांमधे परिवर्तन करून शेतमालाचे मूल्यवर्धन (व्हॅल्यू ॲडिशन) करणे, तसेच आंब्याचे भाव पडताच रडारड करण्यात वेळ वाया न घालविता आंबा कॅनिंगला पाठवणे अशा पर्यायी उपाययोजनांचा अवलंब जर पश्चिम महाराष्ट्र व कोकणातील बागायतदार यशस्वीरित्या करू शकतात; तर महाराष्ट्राच्या इतर प्रदेशातील शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांच्या बाबतीत ते का शक्य होऊ नये?

पावसाच्या पाण्यावर पूर्णत: अवलंबून असलेल्या विदर्भ व मराठवाड्यासारख्या कोरडवाहू क्षेत्रात जर पावसाने दगा दिला; किंवा कोणत्याही प्रकारच्या आपत्तीने शेतकरी संकटात सापडला तर बहुदा अनेकवेळा तो सरकारला मदतीसाठी साकडे घालतो. ती न मिळाल्यास दोषारोप करतो, अथवा वर उल्लेख केल्याप्रमाणे नैराश्यापोटी आत्मघाताचे टोकाचे पाऊल उचलतो. मध्यंतरी विदर्भातील संत्रा बागांना गारपिटीने तडाखा दिल्यानंतरचे दृश्य अंतर्मुख करणारे होते. निसर्गाच्या तांडवाने काही क्षणात जमीनदोस्त केलेल्या संत्र्यांचे ढीग रस्त्यांच्या कडेला लागले होते. मी एका बागायतदाराला विचारलं, ‘‘तुम्ही आता या संत्र्यांचं काय करणार?’’ त्याने थोडाही वेळ वाया न घालविता उत्तर दिलं- ‘‘या फळांचा काहीही उपयोग नाही, आता ती अशीच सडून जाणार. मी आता सरकारकडे नुकसान भरपाई मागणार.’’

मी दुसरा प्रश्न विचारला - ‘‘आणि नुकसान भरपाई नाही मिळाली तर?

‘‘-तर आत्महत्या करण्याशिवाय माझ्याजवळ पर्याय राहणार नाही!’’ त्याने त्वरित उत्तर दिलं. केवळ संत्र्यावर अवलंबून न राहता एखाद्या पर्यायी पिकाची लागवड करणे; किंवा संत्र्याचे भाव पडले अथवा डाग पडलेल्या संत्र्यांना बाजारात उठाव नसेल तर; फळाच्या प्रत्येक भागापासून विविध उत्पादने तयार करून पिकाच्या मूल्यवर्धनाबद्दल कृती न करता जीव देण्याचा विचार करणे योग्य आहे का? असा विचारही करणे कुणाच्याच हिताचे नाही. ज्या पिकाचे ‘नोटा छापण्याचे मशिन’ असे वर्णन करता येईल अशा एका अपरंपरागत पिकाबद्दल शेतकऱ्यांना माहिती देण्यासाठी चार वर्षांपूर्वी काही गावांत गेलो असताना- स्वत: त्या पिकाची लागवड न करता इतर कुणीतरी करावी, अशा वृत्तीचा सर्वत्र अनुभव आला आणि मी स्वत:लाच प्रश्न विचारला- ‘‘पराक्रम गाजविण्यासाठी शिवाजी महाराजांनी शेजारच्या घरातच जन्म घ्यायला हवा का?’’ ■